प्रेस नोट १७ दिनांक ०७/१०/२०२५

-----------------------

## ट्रॉम्बे पोलीसांची पुन्हा एकदा धडक कारवाई, २ किलो गांजा हस्तगत ...

परिमंडळ ६ अधिनस्त ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत देवी विसर्जन बंदोबस्त दरम्यान महाराष्ट्र नगर, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोर पोह पवार, पोशि कोकरे व एमएसएफ जवान होळंबे यांस एक संशयास्पद वाहन दिसून आले. वाहनास बाजूला घेवून त्याची तपासणी करीत असताना सदर वाहनाचा चालक हा त्याचे ताब्यातील एक बॅग लपवित असल्याचे दिसून आल्याने बॅगची तपासणी केली असता बॅगमध्ये १,६०,०००/- रू. किमतीचा ८ किलो, १७६ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला होता. त्या अनुषंगाने ट्रॉम्बे पोलीस ठाणेस कलम ८ (क), २० (ब), २९ अंमली पदार्थ विरोधी अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून राहुल पिंटू शिंदे, वय २३ वर्षे, राठी.- देसाई गाव, पलावा सिटीजवळ शिळफाटा, कल्याण, ठाणे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकण ८ किलो १७६ ग्रॅम वजनाचा गांजा, किंमत अंदाजे, १,६०,०००/- रू., एक व्हॅगनार मोटार कार, किं.अ. ८,००,०००/- रू, एक ओप्पो कंपनीचा मोबाईल, किं.अं. ४,०००/- रू., व रू. ३,०००/- रोख रक्कम अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पूढील तपास सपोनि सुशिल लोंढे करीत होते.

सदर गुन्हयात पुढील तपासादरम्यान अटक आरोपीताचे काही साथीदार असून ते देखील अशाच प्रकारे ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी आणत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे ट्रॉम्बे पोलीसांनी पाहिजे आरोपीत राजू अंबादास शिंदे, वय ३५ वर्षे याचा शोध घेण्यासाठी पथक तयार केले. सदर पथकाने तांत्रिक तपासाचे आधारे पाहिजे आरोपीताचा कल्याण पासून पाठलाग करीत होते. सदर आरोपी हा वाशी टोलनाक्याजवळ दक्षिणवाहिनी मुंबईकडे जाणा-या रस्त्यावर मिळून आला. आरोपीताच्या ताब्यात चार चाकी गाडीसह रू. ४०,०००/- किमतीचा २ किलो ५० ग्रॅम मिळून आला. सदरचा अंमली पदार्थ हा तो चिता कॅम्प, महाराष्ट्रनगर, मानखुर्द परिसरात विक्रिकरीता आणला असल्याची माहिती त्याने दिली.

आरोपी नामे राजू अंबादास शिंदे, वय ३५ वर्षे, देसाई गाव, पाटील पाडा, पोस्ट पडले, जि. ठाणे यास अटक करण्यात आली असून त्याचेकडून रू. ४०,०००/- किमतीचा २ किलो ५० ग्रॅम गांजा, रू. ५,००,०००/- किमतीचा मारूती सुझुकी कंपनीची मोटार कार, एक ओप्पो कंपनीचा मोबाईल व रू. ५७१८/- रू . रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. अटक आरोपीताविरोधात यापूर्वी धाराशिव येथे अंमली पदार्थ अधिनियम अन्वये अंमली पदार्थ विक्री करीता जवळ बाळगणे करीता दोन गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सुशिल लोंढे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई श्री महेश पाटील सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ६, मुंबई श्री. समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, मुंबई श्री राजेश बाबशेट्टी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे श्रीमती ऋता नेमलेकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुशिल लोंढे, पोउनि शरद नाणेकर, पोह पाटील, पोशि शिवाजी सकट, पोशि गोविंद बाड, मपोशि सुजाता जगदाळे यांनी केली आहे. दोन दिवसापुर्वी सदर पथकाने ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत रू. ४०,०००/- किमतीचा ४० ग्रॅम एमडी हस्तगत केली असून सदर पथकाची ही सलग तिसरी कारवाई आहे.

-----------------------------